THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

FRIDAY, 7TH FEBRUARY 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८९६ चा मसुदा नंबर १.

### सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्या अर्थी सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट खालीं लिहिलेल्या रीतीनें सुधारणें योग्य आहे, त्या अर्थी खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

कलम २ यांत जास्त मजकूर दाखल करणें.

१. सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट, ज्यास ह्यापुढें सदरहू आक्ट ह्मटलें आहे, त्याच्या २ ऱ्या कलमांत खालील पोट-कलम ज्यास्त दाखल करावें, आणि तें त्यांत नेहमीं होतें असें समजावें: तें पोटकलम येणेंप्रमाणें :—

"(३) आणि सन १८८७ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट ह्या अन्वयें केलेल्या ज्या ज्या कानू व नेमणुका, प्रसिद्ध करण्यांत आलेले जे जे जाहिरनामे आणि देण्यांत आलेले जे जे अधिकार हा आक्ट अमलांत यावयाच्या तारखेस अमलांत असतील त्या त्या कानू व नेमणुका आणि ते ते जाहिरनामे व अधिकार ह्या आक्टाला अनुसरून असतील तेथवर, अनुक्रमें ह्या आक्टाअन्वयें केलेल्या आहेत, आणि प्रसिद्ध केले व दिले आहेत असें समजावें.

कलम १२ याची सुधारणा.

२. सदरहू आक्टाच्या १२ व्या कलमांतील (१) पोटकलमांत, "तो बॉयलर मुंबई शहरांत असला तर तो अर्ज पोहोंचल्याच्या तारिखेनंतर चार दिवसांच्या आंत, व तो बॉयलर इतर ठिकाणीं असला तर तो अर्ज पोंचल्याच्या तारिखेनंतर दहा दिवसांच्या आंत" ह्या मजकुराच्या बदला खालील मजकूर दाखल करावा तो येणेंप्रमाणें:—

"तो बॉयलर जर—

(अ) मुंबई शहरांत असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून चार दिवसांच्या आंत,

(ब) एडन अगर पेरिम ह्या वसाहतींत असला तर तो अर्ज पोंचल्याच्या तारखेपासून एका महिन्यांच्या आंत, आणि

(क) इतर ठिकाणीं असला, तर तो अर्ज पोंचल्याच्या तारिखेपासून दाहा दिवसांच्या आंत."

कलम १८ ह्याची सुधारणा.

३. सदरहू आक्टाच्या १८ व्या कलमांतील (१) पोट-कलमांत,—

(अ) "मुंबई शहरांत कोणत्याही प्रेसिडेन्सी माजिस्ट्रेटानें" ह्या शब्दांच्या बदला "मुंबईच्या कलेक्टरानें अगर मुंबई शहरच्या कोणत्याही प्रेसि-डेन्सी माजिस्ट्रेटानें" हे शब्द दाखल करावे; आणि

(ब) "अशा माजिस्ट्रेटानें किंवा कलेक्टरानें" ह्या शब्दांच्या बदला "सदरहू शहराच्या अशा कलेक्टरानें अगर माजिस्ट्रेटानें किंवा इतर ठिकाणच्या अशा कलेक्टरानें" हे शब्द दाखल करावे.

कलम २४ ह्यांत जास्त मज-कुर दाखल करणें.

४. सदरहू आक्टाच्या २४ व्या कलमाच्या (३) ऱ्या रकमेंत खालील रकम जास्त दाखल करावी:—

"आणि असा जाहिरनामा प्रसिद्ध झाला ह्मणजे अशा एन्जिनियरचा दाखला रद्द करण्याचा सरकारास अधिकार आहे.

"मात्र असें ठरविलें आहे कीं, अशा एन्जिनियरानें जर आपण निघून गेल्या-बद्दल अगर आपला दाखला हजर करण्यामध्यें हयगयी झाल्याबद्दल सरकारची खात्री होईल असा खुलासा केला, तर, सरकारास, कोणत्याही वेळीं, तो दाखला रद्द करण्याबद्दलचा सदरहू प्रकारचा हुकुम रद्द करण्याचा आणि सदरहूप्रमाणें रद्द केलेला दाखला त्या एन्जिनियरास परीक्षा घेतल्याशिवाय देण्याचा अधिकार आहे.

"आणि अशा रीतीनें दिलेल्या दाखल्याचा अमल, तो दाखला परीक्षा घेऊन दिलेला असल्याप्रमाणेंच चालेल."

कलम २६ ह्यांत जास्त मज-कुर दाखल करणें.

५. सदरहू आक्टाच्या २६ व्या कलमांत खालील रकम जास्त दाखल करावी:—

"दाखल्याच्या डुप्लिकेट प्रती देण्याबदल फी घ्यावयाची ती ३९ व्या कलमाच्या (फ) रकमेखालीं केलेल्या कानूअन्वयें ठरविण्याचा सरकारास अधिकार आहे."

---

## हेतु व कारणें ह्यांचें निरूपण.

सन १८८७ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयींचा आक्ट रद्द करण्यांत आला त्यावेळीं ज्या कानू, नेमणुका, जाहिरनामे व अधिकार अमलांत होते ते तसेच चालू ठेवण्यासाठीं, सन १८९१ चा मुंबईचा बॉयलर तपासण्याविषयीं आक्ट ह्यांत कोणताही ठराव दाखल करण्यांत आला नव्हता. ह्या चुकीपासून होणारी गैरसोय दूर करण्यासाठीं, ह्या मसुद्याचें कलम १ हें, त्याचा अमल पूर्व गोष्टींस लागू होई अशा रीतीनें, दाखल केलें आहे.

२. कमिशनाकडे पाठविलेलीं आपिलें १२ व्या कलमाच्या (१) पोट कलमाअन्वयें ज्या वेळाच्या आंत चौकशी करून निकालास लाविलीं पाहिजेत, तो वेळ एडनच्या बाबतींत वाढविणें अत्यंत अवश्यक आहे असें आढळून आलें आहे. त्या ठिकाणीं अशा अपिलांची सुनावणी करण्याच्या कामीं एक्झिक्युटिव एंजिनियर, मिलिटरी वर्क्स डिपा-र्टमेंट, एवढाच मात्र अमलदार उपयोगी पडण्यासारखा असतो, आणि तो इतर पुष्कळ कामांमध्यें गुंतलेला असतो एव-ढेंच केवळ नव्हे, तर, त्याला, पेरिमहून अगर इतर कोणत्याही बाहेरच्या जागेहून अपील येऊन पोंचल्याबरोबर, तें अपील ज्या बॉयलर संबंधाचें असेल तो बॉयलर जाऊन तपासण्याकरितां, कांहीं व्यवस्था केल्याशिवाय आपला हेडकार्टर सोडून जाण्यास बनत नाहीं.

ह्मणून, अशा अपिलांची सुनावणी करण्याची मुदत एडनच्या बाबतींत वाढवून एक महिन्याची करण्याचें ह्या मसुद्याच्या दुसऱ्या कलमाअन्वयें योजिलें आहे.

३. हल्लींच्या आक्टाच्या १८ व्या कलमांत, मुंबईच्या कलेक्टरास, कोणत्याही बॉयलराच्या मालकाला त्या बॉयलरचा दाखला हजर करण्यास हुकुम करण्याचा किंवा तसा हुकुम करण्यास इतर कोणत्याही मनुष्यास अधिकार देण्याचा अख्त्यार दिला नाहीं. ही उणीव भरून काढण्यासाठीं ह्या मसुद्याचें ३ रें कलम योजिलेलें आहे.

४. अनुभवावरून असें दिसून आलें आहे कीं, हल्लींच्या २४ व्या कलमांत जे अधिकार दिलेले आहेत ते, दुराग्रहाच्या किंवा पळून जाण्याच्या प्रकरणांचा सरकाराकडून चांगला निकाल लागण्यास पुरेसे नाहींत. सदरहू मसुद्याच्या ४ थ्या कलमांत सांगितलेल्या प्रकारच्या जास्त अधिकारांची जरूरी आहे.

५. जे एन्जिनियर लोक आपले दाखले हरवतात, त्यांच्या निष्काळजीपणाचा प्रतिकार करणें हल्लींच्या २६ व्या कलमावरून अशक्य आहे असें दृष्टोत्पत्तीस आलें आहे. सदरहू कलमांतल्या सख्त ठरावांचा अर्थ केवळ शब्दार्थाकडेच दृष्टी देऊन केला असतां, कपटाच्या बाबतींमध्यें, त्यांचा अमल व्हावा तसा होणार नाहीं. ही गोष्ट जमीन महसूल, कस्टम व अफीण यांच्या कलेक्टरांनीं सरकारच्या नजरेस आणिली आहे. आणि ह्मणून कलम ५ ह्यांत निर्दिष्ट केलेले जास्त निर्बंध ठेवून ह्याचा बंदोबस्त करावा हें इष्ट वाटत आहे.

मुक्काम मुंबई, तारीख २० माहे जानेवारी सन १८९६.

(सही.) एच्. वर्डवुड.

(True Translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

---

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.